## टीसीएस आयटी क्विझ २७ सप्टेंबरला

नागपूर, ता. १२ : टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे (टीसीएस) देशभरातील १५ शहरांतील शालेय विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञान प्रश्नमंजूषेचे आयोजन २७ सप्टेंबर रोजी नागपुरात केले आहे. सिव्हिल लाइन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात ही स्पर्धा होईल. स्पर्धेसाठी प्रवेश निःशुल्क आहे. आठवी ते बारावीचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. प्रत्येक शाळेतून दोन विद्यार्थ्यांची एक चमू, अशा कितीही चमू सहभागी होऊ शकणार आहेत. सहभागासाठी संबंधित संस्थांतर्फे २४ सप्टेंबरपर्यंत प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेश नोंदणीसाठी प्रशांत कोपरकर, टीसीएस आयटी क्विझचे संयोजक, अग्रवाल हाउस, बुराडे गली, तेलीपुरा, सीताबर्डी येथे संपर्क करावा किंवा www.tcsitwiz.com या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करता येईल.